**तहसिल कार्यालय नाशिक**

**परिशिष्ट**

**महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम 42- ब /42 - क / 42 - ड मधील तरतूदींन्वये**

**भोगवटादारास द्यावयाची सनद**

**(अकृषिक वापराची परवानगी)**

---

**वाचले :- 1) शासन परिपत्रक क्रमांक : एनएपी-2021/प्र.क्र.118/ज-1अ दिनांक 13 एप्रिल 2022**

---

**क्र. जमा-1/42-ब/एस.आर./253/2024**

**नाशिक दि.05 /07/ 2024**

**ज्या अर्थी दिपक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. दिपक कल्याणजी चंदे** रा. 101, आनंद प्लाझा, पहिला मजला, विद्युत भवन जवळ, नाशिक पुणे रोड, नाशिक ता. जि. नाशिक या जमीन धारकाने महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम **42-ब** मधील तरतूदींन्वये, यांनी मौजे **नाशिक**-3 ता. जि. नाशिक येथिल **स. नं./ ग. नं. 412 चे 7/12 नुसार एकुण क्षेत्र 9300.00 चौ. मी.** या क्षेत्राचे **निवासी** प्रयोजनार्थ बिनशेती सनद मिळणेबाबत. अकृषिक प्रयोजनासाठी, उक्त संहितेच्या कलम 47 अ नुसार देय रुपांतरण कराची वर नमुद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम **रु. 73656/- दिनांक** 03/07/2024 **चलन क्र.** MH004671391202425E भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या नियमांच्या आणि खालील शर्तीना अधिन राहुन उपरोक्त जमिनीच्या धारकास सदर जमिनीवर, उक्त नमुद करण्यात आलेला अकृषिक वापर अनुज्ञेय करण्यात आल्याचे मानण्यात आल्याने उक्त संहितेच्या कलम 42- ब अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

01. वरीलप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या अकृषिक वापरामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
02. जमिनीवर प्रत्यक्ष विकास अथवा बांधकाम सुरु करण्यापूर्वी सक्षम नियोजन प्राधिकरणाची विकास परवानगी घेणे आवश्यक राहिल.
03. जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्या मान्यतेने रेखांकन मंजूर केल्याशिवाय क्षेत्राची पोटविभागणी करता येणार नाही अथवा छोटे भूखंड करुन विक्री करता येणार नाही.
04. नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास, त्याची माहिती अशा मंजूरीपासून 30 दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे बंधनकारक राहिल.
05. अकृषिक वापर अनुज्ञेय करण्याच्या या सनदे व्यतिरिक्त वित्तीय संस्था / नियोजन प्राधिकरण यांनी इतर कोणत्याही स्वरुपातील बिनशेती आदेशाची मागणी करु नये.

**(डॉ. शोभा पुजारी)**

**तहसिलदार, नाशिक**

**(तहसिलदाराची मोहर)**

**प्रति — दिपक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. दिपक कल्याणजी चंदे** रा. 101, आनंद प्लाझा, पहिला मजला, विद्युत भवन जवळ, नाशिक पुणे रोड, नाशिक ता. जि. नाशिक

**प्रत :- तलाठी नाशिक-3 ता. जि. नाशिक** यांच्याकडे आवश्यक त्या पुढील कार्यवाहीस्तव रवाना.